जान-१५१-२००० (१-१४)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## 2014-15

## क्र.साप्रवि/एफजीआर/18 दि.12.11.2014

विषय- बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांची अर्जित रजा /अर्धवेतनी रजा परिगणन तसेच रजा रोखीकरण व रजेची कमाल मर्यादा याबाबत मनपा (सेवा) नियमावलीत सुधारणा करणे.

संदर्भ- 1) शासन निर्णय क्र.अरजा/2488/395/सेवा-9 दि.9.11.1990

2) स्थायी समिती ठराव क्र.204 दि.11.06.2014.

3) महानगरपालिका ठराव क्र.271 दि.03.07.2014.

4) शासन निर्णय क्र. अरजा/2401/8/सेवा-9 दि.15.1.2001.

5) शासन निर्णय क्र. अरजा/2401/7/सेवा-9 दि.15.1.2001.

6) स्थायी समिती ठराव क्र.161 दि.30.5.2014.

7) महानगरपालिका ठराव क्र.270 दि.3.7.2014.

---

बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांची अर्जित रजा /अर्धवेतनी रजा परिगणन तसेच रजा रोखीकरण व रजेची कमाल मर्यादा इ. विषयाबाबत महाराष्ट्र शासनाने प्रसारीत केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई मनपा सेवा नियमावलीत सोबतच्या जोडपत्र 'अ' नुसार तसेच परिगणनेच्या पध्दतीत जोडपत्र 'ब' नुसार सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार सादर केलेल्या प्रस्तावास स्थायी समितीची / महानगरपालिकेची अनुक्रमे संदर्भ क्र.2 ते 3 आणि 6 ते 7 अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

अ) सोबतच्या जोडपत्र 'अ' नुसार अर्जित रजा व अर्धवेतनी रजा यांच्या रोखीकरणाच्या पध्दतीत मनपा सेवा नियम 157,162,166,168 व 169 मध्ये तसेच अर्जित रजा व अर्धवेतनी रजा यांच्या परिगणनेच्या पध्दतीत नियम 153,154, व 161 मध्ये मनपा ठरावाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.3.7.2014 पासून सुधारणा करण्यात

येत आहे. मात्र परिगणनेच्या सुलभतेच्या दृष्टीकोनातून सुधारित परिगणना दि.1 जुलै 2014 पासून अंमलात येईल.

ब) महानगरपालिका कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेली अर्जित रजेची कमाल मर्यादा 240 दिवसावरुन 300 दिवस साठविण्यास तसेच सेवासमाप्तीच्या वेळी 300 दिवसांपर्यंत न उपभोगलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्यासाठीची तरतूद महानगरपालिकेच्या ठरावाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

क) वर्षाच्या 1 जानेवारी किंवा 1 जुलै रोजी ज्यांच्या खाती 300 दिवस किंवा त्यापेक्षा कमी परंतू 285 दिवसांपेक्षा जास्त अर्जित रजा शिल्लक असेल अशा प्रकरणी आगाऊ जमा करावयाची 15 दिवस अर्जीत रजा स्वतंत्र दाखविण्यात यावी आणि त्या अर्धवर्षामध्ये कर्मचारी जेवढी अर्जित रजा घेईल तेवढी अर्जित रजा अशा रितीने स्वतंत्र दाखविण्यात आलेल्या 15 दिवसांच्या अर्जित रजेशी प्रथम समायोजित करावी. संबंधित अर्धवर्षामध्ये जर कर्मचा-याने 15 दिवसा पेक्षा जास्त अर्जित रजा उपभोगली असेल तर 15 दिवसापेक्षा जास्त घेण्यात आलेली रजा शिल्लक अर्जित रजे मधून वजा करण्यात यावी. असे केल्यानंतर जी अर्जित रजा शिल्लक राहिल ती कर्मचा-यांच्या अर्जित रजाखाती 300 दिवसांच्या मर्यादेच्या अधिन राहून अर्धवर्षाच्या शेवटी जमा करण्यात यावी. कर्मचा-याने अर्धवर्षात 15 दिवसापेक्षा कमी रजा उपभोगल्यास 300 दिवसांपेक्षा अधिक होत असलेली अर्जित रजा अर्धवर्षाच्या शेवटी व्यपगत होईल.

ड) महानगरपालिका कर्मचा-यांसाठी सेवेमध्ये असताना 30 दिवसांच्या मर्यादेपर्यंत अर्जित रजेच्या रोखीकरणाबाबत विद्यमान तरतूद ही मनपा ठरावाच्या दिनांकापासून बंद करण्यात येत आहे.

इ) कोणत्याही कारणास्तव सेवा समाप्तीनंतर अर्धवेतनी रजेचे रोखीकरण करण्याबाबतची विद्यमान तरतूद ही दि.1.1.2006 किंवा नंतर मनपा सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत बंद करण्यात येत आहे.

ई) परिगणनेसाठी उदाहरण सोबतच्या जोडपत्र 'ब' मध्ये जोडण्यात आले आहे.

सर्व खाते प्रमुख व सहा. आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, परिपत्रकातील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित आस्थापना कर्मचा-यांना दयावेत.

| | | |
|---|---|---|
| सही/-दि.11.9.2014 | सही/-दि.12.9.2014 | सही/- |
| श्री.पां.वि.गोसावी | श्री.किरण आचरेकर | श्री.विकास खारगे |
| उप प्रमुख लेखापाल (आस्था-2) | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) |

सही/-दि.10.11.2014
श्री.सिताराम कुंटे
महानगरपालिका आयुक्त

**परिपत्रक**

**2014-15**

**क्र.साप्रवि/एफजीआर/18 दि.12.11.2014**

प्रत ------------------------------ यांना ( ----------------- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

24.11.14

**उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) यांजकरिता**

E:\Backup on 19 Sept 2014\2014 Est II\FGR\EL HPL Revised Cir 21 Aug 14.docx

## जोडपत्र 'अ'

| विद्यमान नियम | प्रस्तावित नियम |
| --- | --- |
| 153<br>**दीर्घ सुटी खात्यांव्यतिरिक्त अन्य खात्यांमध्ये सेवेत असलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांसाठी अर्जित रजा.**<br>1 (ए) दीर्घ सुटी खात्यांव्यतिरिक्त अन्य खात्यांमध्ये सेवेत असलेल्या कायम (स्थायी) आणि हंगामी (अस्थायी) महानगरपालिका कर्मचा-यास कर्तव्यार्थ व्यतीत केलेल्या कालावधीच्या 1/11 एवढया प्रमाणात अर्जित रजा मिळण्याचा हक्क असेल. | 153<br>**दीर्घ सुटी खात्यांव्यतिरिक्त अन्य खात्यांमध्ये सेवेत असलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांसाठी अर्जित रजा.**<br>1 (ए) दीर्घ सुटी खात्यांव्यतिरिक्त अन्य खात्यांमध्ये सेवेत असलेल्या प्रत्येक महानगरपालिका कर्मचा-यांच्या अर्जित रजा खाती, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी 15 दिवस याप्रमाणे दोन हस्यांमध्ये अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात येईल. |
| (बी) जेव्हा महानगरपालिका कर्मचा-यास देय असलेली अर्जित रजा 240 दिवस एवढी होईल तेव्हा खंड (ए) अनुसार अशी रजा अर्जित होणे बंद होईल. (सदर सुधारणेचा प्रभाव दि.1.9.1988 पासून दिलेला आहे) | (बी) महानगरपालिका कर्मचा-यांच्या अर्जित रजा खाती मागील अर्ध्या वर्षाच्या अखेरीस जमा असलेली अर्जित रजा पुढील अर्ध्या वर्षामध्ये जमा करण्यात येईल. मात्र, अशा रितीने जमा केलेली मागील अर्जित रजा व पुढील अर्ध्या वर्षाकरिता आगाऊ जमा करण्यात येणारी अर्जित रजा 300 दिवसांच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही. |
| (सी) स्वीयेतर (परसेवेत) सेवेमध्ये व्यतीत केलेला कालावधी हा अश कालावधीबद्दल रजा वेतनाचे अंशदान देण्यात येत असेल तर, या नियमाच्या प्रयोजनासाठी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात येईल. | बदल नाही. |
| **154: अर्जित रजेची गणना**<br>(1) नियम 153 च्या पोटनियम 1 (ए) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जित रजेची गणना करताना प्रत्यक्षात केलेल्या कामाचे दिवस प्रथम मोजण्यात यावेत आणि त्यास 1/11 ने गुणल्यानंतर येणा-या गुणाकारावरुन पूर्ण दिवस व दिवसाचा भाग स्पष्ट दर्शवावा. | **154: अर्जित रजेची गणना**<br>(1) ज्या कॅलेंडर वर्षामध्ये महानगरपालिका कर्मचा-याची नियुक्ती झाली असेल त्या कॅलेंडर वर्षाच्या अर्ध्या वर्षामध्ये तो जेवढे महिने सेवा करण्याची शक्यता असेल त्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला 2/1-2 (अडीच दिवस) हया दराने त्याच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात येईल. |
| (2) रजा अर्जित होण्याच्या प्रमाणात बदल झाल्यास, अर्जित रजेमधील अपूर्णांकाचे नजीकच्या पूर्ण दिवसांमध्ये रुपांतर करण्यात येईल. म्हणजेच अर्ध्या पेक्षा कमी अपूर्णांक वगळण्यात येईल. व अर्धा आणि त्याहून अधिक असलेला अपूर्णांक एक पूर्ण दिवस असल्याचे समजण्यात येईल. | 2) ज्या अर्धवर्षाच्या कालावधीमध्ये मनपा कर्मचा-याची कोणत्याही कारणामुळे सेवा संपुष्टात येईल त्या दिनांकापर्यंत सेवेच्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला 2 ½ (अडीच दिवस) हया दराने त्याच्या खाती अर्जित रजा जमा करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | 3) जर एखादया महानगरपालिका कर्मचा-याने अर्ध्या वर्षामध्ये असाधारण रजा घेतली असेल आणि / किंवा अनुपस्थीतीचा काही कालावधी अक्षमापित निलंबन कालावधी "अकार्यदिन" (Dies-non) रजेविना अनुपस्थिती (AWL) म्हणून समजण्यात आला असेल तर पुढील अर्ध्या वर्षाच्या सुरुवातीस त्याच्या रजा खाती जमा करावयाची रजा, अशा रजेच्या आणि / किंवा "अकार्यदिन" (Dies-non) रजेविना अनुपस्थिती (AWL)कालावधीच्या 1/10 इतकी कमी करण्यात येईल मात्र अशी कमी करावयाची रजा 15 दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.<br>(4) अर्जित रजा जमा करताना रजेचे दिवस अपूर्णांकात आल्यास ते नजीकच्या दिवसाशी पुर्णांकीत करण्यात येतील. |
| **157 दीर्घ सुट्टी खात्यामध्ये सेवेत असलेल्या व्यक्तींसाठी अर्जित रजा**<br>157 (3) या नियमाखालील कोणत्याही प्रकारच्या रजेबरोबर दीर्घ सुट्टी घेता येईल किंवा दीर्घ सुट्टीला जोडून कोणतीही रजा घेता येईल.<br>मात्र दीर्घ सुट्टी आणि तिला जोडून घेतलेली अर्जित रजा मग ती अर्जित रजा दुस-या रजेबरोबर अथवा अशा रजेला जोडून घेतलेली असो वा नसो याचा एकूण् कालावधी महानगरपालिका कर्मचा-याला नियम 153 खाली एकावेळी देय आणि अनुज्ञेय असलेल्या अर्जित रजेपेक्षा अधिक होता कामा नये<br>आणखी असे की, दीर्घ सुट्टी, अर्जित रजा आणि परिवर्तीत रजा जोडून होणारा एकूण कालावधी 240 दिवसापेक्षा अधिक होता कामा नये | 157 (3) या नियमाखालील कोणत्याही प्रकारच्या रजेबरोबर दीर्घ सुट्टी घेता येईल किंवा दीर्घ सुट्टीला जोडून कोणतीही रजा घेता येईल.<br>मात्र दीर्घ सुट्टी आणि तिला जोडून घेतली अर्जित रजा मग ती अर्जित रजा दुस-या रजेबरोबर अथवा रजेला जोडून घेतलेली असो वा नसो याचा एकूण् कालावधी महानगरपालिका कर्मचा-याला नियम 153 खाली एकावेळी देय आणि अनुज्ञेय असलेल्या अर्जित रजेपेक्षा अधिक होता कामा नये<br>आणखी असे की, दीर्घ सुट्टी, अर्जित रजा आणि परिवर्तीत रजा जोडून होणारा एकूण कालावधी 300 दिवसापेक्षा अधिक होता कामा नये |
| **161: अर्धवेतनी रजा**<br>(ए) कायम आणि हंगामी महानगरपालिका कर्मचा-यास त्याने सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी 20 दिवसांची अर्धवेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल.<br>**टिप:** एखादा महानगरपालिका कर्मचारी सेवेचे वर्ष ज्या दिवशी पूर्ण करील त्या दिवशी तो असाधारण रजेसह किंवा वाढविलेल्या रजेसह रजेवर असल्यास त्याला | **161: अर्धवेतनी रजा**<br>(ए) (एक) प्रत्येक महानगरपालिका कर्मचा-याच्या अर्धवेतनी रजा खाती प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी दहा दिवस याप्रमाणे दोन हस्यांमध्ये अर्धवेतनी रजा आगाऊ जमा करण्यात येईल.<br>(दोन) ज्या कॅलेंडर वर्षाच्या अर्ध्या वर्षामध्ये |

| | |
|---|---|
| (कामावर परत रुजू न होता) अर्धवेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल. | महानगरपालिका कर्मचा-याची नेमणूक झाली असेल त्या अर्ध वर्षामध्ये महानगरपालिका कर्मचारी जेवढे महिने सेवा करण्याची शक्यता असेल, अशा प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला 5/3 या दराने अर्धवेतनी रजा त्याच्या अर्धवेतनी रजा खाती जमा करण्यात येईल.<br>(तीन) ज्या अर्धवर्षाच्या कालावधीमध्ये मनपा कर्मचा-यांची कोणत्याही कारणामुळे सेवा संपुष्टात येईल त्या दिनांकापर्यंत सेवेच्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्याला 5/3 या दराने त्याच्या खाती अर्धवेतनी रजा जमा करण्यात येईल.<br>(चार) महानगरपालिका कर्मचा-याच्या अनुपस्थितीचा कालावधी किंवा निलंबनाचा कालावधी (अक्षमापित) अर्ध वर्षामध्ये "अकार्यदिन" (Dies-non) रजेविना अनुपस्थिती (AWL) असा समजण्यात आला असेल किंवा निलंबनाचा कालावधी अक्षमापित असेल त्याबाबतीत पुढील अर्ध वर्षाच्या सुरुवातीस त्याच्या अर्ध वेतनी रजेच्या खाती जमा करावयची अर्धवेतनी रजा अशा "अकार्यदिन " रजेविना अनुपस्थिती कालावधी (Dies-non) कालावधीच्या 1/18 इतकी कमी करण्यात येईल. मात्र अशी कमी करावयाची रजा दहा दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.<br>(पाच) अर्धवेतनी रजा जमा करताना रजेचे दिवस अपुर्णांकीत झाल्यास ते नजीकच्या दिवसाशी पुर्णांकित करण्यात येतील. |
| 161 (बी) महानगरपालिका कर्मचा-यास त्याला देय असलेली अर्धवेतनी रजा वैद्यकीय प्रमाणपत्रावर किंवा खाजगी कामकाजासाठी मंजूर करता येईल.कर्मचारी मुंबई मध्ये असल्यास त्याच्या बाबतीत महानगरपालिका वैद्यकीय परिक्षकांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच अशा प्रमाणपत्रावरील अर्धवेतनी रजा देण्यात येईल. कर्मचारी मुंबई बाहेर असल्यास जिल्याचा दिवाणी शल्यचिकित्सक किंवा संपूर्णतः शैक्षणिक अर्हता असलेला वैद्यक व्यवसायीक यांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच अशा प्रमाणपत्रावरील अर्धवेतनी रजा देण्यात येईल. | 161 (बी) बदल नाही. |
| **162 परिवर्तीत रजा (रुपांतरीत रजा)** | **162 - बदल नाही.** |

| | |
|---|---|
| (1) महानगरपालिका कर्मचा-यास, त्याला देय असलेल्या अर्धवेतनी रजेच्या निम्मेपेक्षा जास्त नसलेली परिवर्तीत रजा, पुढील शर्तींच्या अधिन राहून वैद्यकीय प्रमाणपत्रावर मंजूर करता येईल.<br>(ए) महानगरपालिका कर्मचारी रजा संपल्यानंतर कामावर परत रुजू होण्याची वाजवी शक्यता आहे अशी रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याची खात्री पटली पाहिजे.<br>(बी) परिवर्तीत रजा मंजूर करण्यात येईल तेव्हा अशा रजेच्या दुप्पट दिवस देय अर्धवेतनी रजेच्या खाती खर्ची टाकण्यात येतील.<br>(सी) महानगरपालिका कर्मचा-याने राजीनामा दिल्यास किंवा तो स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यास परिवर्तीत रजेच्या काळात काढलेले रजा वेतन आणि अर्धवेतनी रजेच्या काळात अनुज्ञेय असलेले वेतन यामधील फरकाची रक्कम परत करण्यात येईल अशी कबुली, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी त्या महानगरपालिका कर्मचा-यांकडून घेईल.<br>(2) रजा मंजूर करणा-या प्राधिका-याला लोकहितासाठी म्हणून प्रमाणित केलेल्या एखाद्या मान्यताप्राप्त पुर्णकालीन किंवा अंशकालीन शिक्षणक्रमासाठी<br>आणि अंतिम परिक्षेची तयारी करण्याकरिता देखील सेवेच्या संपूर्ण कालावधीत कमाल 90 दिवस इतकी परिवर्तीत रजा (वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल न करता) मंजूर करता येईल.<br><br>162 (3) अर्जित रजा आणि परिवर्तीत रजा जोडून होणारा एकूण कालावधी 240 दिवसापेक्षा अधिक होता कामा नये. | 162 (3)- अर्जित रजा आणि परिवर्तीत रजा जोडून होणारा एकूण कालावधी 300 दिवसापेक्षा अधिक होता कामा नये. |
| 166 निवृत्तीपूर्व रजा<br>166 (1) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, देय अर्धवेतनी रजेसह जास्तीत जास्त 240 दिवसांच्या देय अर्जित रजे इतकी निवृत्ती पूर्वी रजा घेण्यास महानगरपालिका कर्मचा-यास परवानगी देऊ शकेल. मात्र रजेचा एकूण कालावधी 28 महिन्यापेक्षा अधिक होता काम नये किंवा अशी रजा सक्तीच्या सेवा निवृत्तीच्या तारखेपलीकडे जाता कामा नये. | 166 (1) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, देय अर्धवेतनी रजेसह जास्तीत जास्त 300 दिवसांच्या देय अर्जित रजे इतकी निवृत्ती पूर्वी रजा घेण्यास महानगरपालिका कर्मचा-यास परवानगी देऊ शकेल. मात्र रजेचा एकूण कालावधी 30 महिन्यापेक्षा अधिक होता कामा नये किंवा अशी रजा सक्तीच्या सेवा निवृत्तीच्या तारखेपलीकडे जाता कामा नये. |

| **168. अर्जित रजेचे प्रत्यर्पण (सेवेमध्ये असताना)** | **168. अर्जित रजेचे प्रत्यर्पण (सेवेमध्ये असताना)** |
|---|---|
| (1) महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याच्या स्वत:च्या इच्छेनुसार कमीत कमी 30 दिवसांची अर्जित रजा घेतल्यावर पुढील शर्तीच्या सापेक्ष (शर्तीच्या अधीन) राहून), एका वित्तिय वर्षात 30 दिवसांच्या मर्यादेपर्यन्तची अर्जीत रजा प्रत्यर्पित करण्याची मुभा देण्यात येईल :--<br>(ए) एका वित्तिय वर्षात एकापेक्षा अधिक वेळा अर्जित रजा प्रत्यर्पित करण्यास मुभा दिली जाणार नाही.<br>(बी) रजा मंजुरीसाठी केलेल्या अर्जासोबतच अर्जित रजेच्या प्रत्यर्पणाबाबतचा अर्ज सादर केला पाहिजे. तथापि, रजा मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकारी, ही, अट शिथिल करु शकतो आणि कर्मचारी कामावर रुजू झाल्यानंतर देखील अर्जित रजेच्या प्रत्यार्पणाबाबतचा अर्ज दाखल करून घेऊ शकतो.<br>(सी) या नियमानुसार, प्रत्यर्पित केलेल्या अर्जित रजेचे-दिवस, प्रत्यक्ष घेतलेली रजा ज्या तारखेस सुरु होईल त्या तारखेस प्रत्यर्पित केले असल्याचे समजण्यात येईल आणि त्या तारखेस महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या रजाखाती असलेल्या रजेमधून ते दिवस वजा करण्यात येतील.<br>(डी) प्रत्यक्ष घेतलेली अर्जित रजा आणि प्रत्यार्पित केलेली अर्जित रजा मिळून होणारी एकूण रजा महानगरपालिका कर्मचाऱ्याला<br>एका वेळी अनुज्ञेय असलेल्या कमाल रजेपेक्षा म्हणजेच, 240 दिवसांपेक्षा अधिक होता कामा नये.<br>(इ) महानगरपालिका कर्मचाऱ्याने जेवढी रजा प्रत्यार्पित केलेली असेल तेवढा कालावधीकरिता अर्जित रजेवरून परत आल्यावर त्याने महानगरपालिकेची सेवा केली पाहिजे.<br>(एफ) सेवानिवृत्त होण्याच्या बेतात असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्याबाबतीत, प्रत्यार्पित केलेल्या रजेचा कालावधी हा, प्रत्यक्ष घेतलेली रजा संपण्याची तारीख आणि सक्तिच्या सेवानिवृत्तिची तारीख यांच्या दरम्यानच्या कर्तव्य कालावधीपेक्षा अधिक होता कामा नये.<br>(जी) निवृत्तीपूर्व रजेच्याबाबतीत अर्जित रजेचे प्रत्यर्पण करण्यास मुभा देऊ नये.<br>(एच) रजेवर असलेला महानगरपालिका कर्मचारी | वगळण्यात आला आहे. |

कामावर हजर न होता जर त्याने नोकरीचा राजीनामा दिला किंवा अन्यथा त्याने महानगरपालिकेची नोकरी सोडली आणि रजारोखीमध्ये वटविलेल्या रजेच्या कालावधीएवढा काळ आवश्यक नोकरी पूर्ण करू शकला नाही तर वटविलेल्या रजेच्या रोख रकमेची वसूली त्याच्याकडून करण्यात येईल. मृत्यु किंवा असमर्थता या प्रकरणांमध्ये मात्र मागितलेल्या रजेच्या कालावधीचा फायदा घेतलेला नसला तरीदेखील त्याच्याकडून वसूली केली जाणार नाही. तसेच, महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेर (आटोक्याच्या बाहेरील) कारणामुळे असे घडले तर, सक्षम प्राधिकारी स्वेच्छानिर्णयानुसार वसुली माफ करू शकतील.

(आय) ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्याला रजा प्रत्यर्पित करण्यास (रजा रोखीमध्ये वटविण्यास) परवानगी देण्यात आलेली असेल त्याला मंजूर करण्यात आलेल्या 30 दिवसांच्या रजेच्या समाप्तीपूर्वी कामावर पुन्हा रुजू होण्यास सामान्यत: परवानगी देण्यात येऊ नये.

(जे) कामावर सक्तिने पुन्हा बोलावण्यात आल्याच्या प्रकरणी, महानगरपालिका कर्मचारी ज्या तारखेपासून अर्जित रजेवर गेला असेल त्या तारखेपासून सहा महिन्याचा कालावधी समाप्त होणे अथवा त्याने रजेच्या प्रत्यार्पणासह पुन्हा अर्जित रजेवर जाणे यापैकी जे अगोदर घडेल त्या पूर्वी त्याची शिल्लक राहिलेली अर्जित रजा घेण्याची त्याला मुभा देण्यात आली पाहिजे. अशा महानगरपालिका कर्मचाऱ्याने विहित कालावधीत रजेसाठी अर्ज केल्यास, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी त्याला रजा मंजूर करील. तथापि, संबंधित महानगरपालिका कर्मचाऱ्याने शिल्लक रजा घेण्यास मुभा मिळावी म्हणून आपण होऊन विनंती केली नाही तर, ती शिल्लक अर्जित रजा व्यपगत होईल आणि उक्त कालावधी जणू काही त्याने ती रजा घेतली आहे असे समजून त्याच्या रजा खाती खर्ची घालण्यात येईल.

(के)जे महानगरपालिका कर्मचारी स्वीयेवर सेवेत (परसेवेत) असतील किंवा प्रतिनियुक्तिवर असतील त्यांना ही सवलत अनुज्ञेय असेल.

(1) स्वीयेतर सेवेमध्ये असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या स्वीयेतर सेवेच्या अटी व शर्ती यामध्ये अशा अशायाची अट समाविष्ट करण्यात यावी की, महानगरपालिका

| | |
|---|---|
| कर्मचाऱ्यास रजाप्रत्यार्पणाचा लाभ मिळण्याचा हक्क असेल आणि स्वीयेतर सेवेमध्ये असताना अशा प्रकारे प्रत्यार्पित केलेल्या रजेच्या संबंधातील महागाई भत्यासह पूरक भत्याचा खर्च स्वीयेतर नियोक्त्याकडून करण्यात येईल.<br>(2) कमीत कमी दहा दिवस एवढी अर्जित रजा घेणाऱ्या रोजंदारी वेतनावरील महानगरपालिका कर्मचाऱ्याला त्याच्या इच्छेनुसार (विकल्पानुसार), त्याची सदर रजा सुरु होण्याच्या तारखेला त्याच्या रजेच्या खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजेपैकी (किंवा तिच्या कोणताही हिस्सा) जास्तीत जास्त 30 दिवसापर्यंत रजा प्रत्यर्पित करण्यास परवानगी देण्यात येईल.<br>(3) अर्जित रजा मंजूर करण्याचा अधिकार प्रदान केलेले प्राधिकारी हे, अर्जित रजेचे प्र्रत्यपण स्वीकारण्यास सक्षम असतील.<br>(4) प्रत्यर्पित रजेच्या संबंधात केवळ अर्जित रजेच्या प्रारंभास अनुज्ञेय असलेले रजा वेतन अधिक महागाई भत्ता आणि असल्यास खाजगी व्यवसाय हानी भत्ता प्रदेय होईल. या प्रयोजनासाठी, रजा ज्या महिन्यात घेतली असेल तो महिना कोणताही असला तरी एक महिना म्हणजे तीस दिवस असे मानण्यात येईल.<br>(5) कर्मचाऱ्याने प्रत्यर्पित रजेच्या बाबतीत रजावेतन व भत्ते यांचे अधिदान रजा प्रवास सहाय्यासह मिळण्याबाबत विनंती केल्यास, त्याला तीन दिवस (कामाचे दिवस) अगोदर अधिदान करण्यात येईल. अन्यथा, त्याची रजा सुरु होण्याच्या अगोदरच्या कामाच्या दिवशी करण्यात यावे. प्रत्यर्पित रजेच्या कालावधीसाठी असलेल्या रजा वेतनामधून भविष्य-निर्वाह निधीची वर्गणी आणि घरभाडे भत्ता यांच्या रकमांची कपात केली जाणार नाही. (प्रभावाचा दिनांक 7-4-1994).<br>(6) प्रत्यर्पित केलेली रजा कर्मचाऱ्यांच्या रजेच्या खात्यावर खर्ची टाकण्यासंबंधीची नोंद घेण्याचे राहून जाऊ नये म्हणून, रजा वेतन काढण्यात येईल त्यावेळी प्रत्यर्पित रजेचा तपाशील त्यांच्या सेवा पुस्तिकांमध्ये आणि त्यांच्या रजा खाती नमूद करण्यात आला पाहिजे. आवश्यक त्या नोंदी सेवा पुस्तिकांमध्ये आणि रजेच्या खात्यात घेण्यात आल्या आहेत अशा अर्थाचे प्रमाणपत्र प्रत्यर्पित रजेच्या रजा-वेतन देयकामध्ये दिले पाहजे | |

| | |
|---|---|
| **169 (1)(ए) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती/ मुदतपूर्व स्वेच्छा निवृत्ती/सेवेमध्ये असताना मृत्यू/ राजीनामा, या घटनांच्यावेळी कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजा आणि अर्धवेतनी रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममुल्य रोख रक्कम**<br>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या तारखेला त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधीच्या संबंधात 240 दिवसांच्या कमाल मर्यादेसापेक्ष (मर्यादेस अधीन राहून) | **169 (1)(ए) - नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती/ मुदतपूर्व स्वेच्छा निवृत्ती/सेवेमध्ये असताना मृत्यू/ राजीनामा, या घटनांच्यावेळी कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजा आणि अर्धवेतनी रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममुल्य रोख रक्कम**<br>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या तारखेला त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधीच्या संबंधात 300 दिवसांच्या कमाल मर्यादेसापेक्ष (मर्यादेस अधीन राहून) |
| **169 (1) (बी)** नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या तारखेला त्याच्या खाती जमा असलेल्या परिवर्तीत रजेमध्ये रुपांतरीत केलेल्या संपूर्ण अर्धवेतनी रजेच्या संबंधात | **169 (1) (बी) बदल नाही** |
| **169 (2)** वरील पोट नियम (1) खाली देय असलेल्या रजा वेतनाच्या सममुल्य रोख रकमेत सेवा निवृत्तीच्या तारखेस अंमलात असलेल्या दराने रजा वेतनावर अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्याचाही समावेश असेल आणि ती सर्व रक्कम अंतिम प्रदान म्हणून एकाच वेळी ठोक रकमेत चुकती केली जाईल. | **169 (2) बदल नाही** |
| **169 (3)** निलंबाधीन असताना सक्तीच्या सेवानिवृत्तीचे वय झाल्यावर (नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय झाल्यावर) सेवानिवृत्त होणा-या महागनरपालिका कर्मचा-याला त्याच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या तारखेस त्याच्या खात्यात जमा असलेल्या अर्जित रजे बद्दल वरील पोट नियम (1) अनुसार रजा- वेतनाची सममुल्य रोख रक्कम देण्यात येईल. मात्र तो महानगरपालिका कर्मचारी पुर्णपणे निर्दोष ठरविलेला आहे. आणि त्याचे निलंबन पूर्णतः असमर्थनीय आहे असे त्याला पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देणा-या सक्षम प्राधिका-याचे मत असले पाहिजे. | **169 (3) बदल नाही** |
| **टीप-3** सेवेत असताना महानगरपालिका कर्मचा-याचा मृत्यू झाल्यास, तो कर्मचारी मृत्यू पावला नसता आणि मृत्यूच्या तारखेच्या लगत नंतर, त्याला देय व अनुज्ञेय होणा-या अर्जित रजेवर आणि अर्धवेतनी रजेवर देखील | **टीप-3** सेवेत असताना महानगरपालिका कर्मचा-याचा मृत्यू झाल्यास, तो कर्मचारी मृत्यू पावला नसता आणि मृत्यूच्या तारखेच्या लगत नंतर, त्याला देय व अनुज्ञेय होणा-या अर्जित रजेवर आणि अर्धवेतनी रजेवर देखील |

| | |
|---|---|
| गेला असता तर त्या मृत कर्मचा-याला रजा वेतनाची अधिक महागाई भत्याची जेवढी सममुल्य रोख रक्कम मिळाली असती तेवढी पण कोणत्याही परिस्थितीत 240 दिवस अर्जित रजे बद्दलचे आणि परिवर्तीत रजेमध्ये रुपांतरीत केलेल्या संपूर्ण अर्धवेतनी रजेबद्दलचे रजा वेतन अधिक महागाई भत्ता याहून अधिक होणार नाही इतकी रोख रक्कम त्याच्या कुटूंबाला देण्यात येईल. | गेला असता तर त्या मृत कर्मचा-याला रजा वेतनाची अधिक महागाई भत्याची जेवढी सममुल्य रोख रक्कम मिळाली असती तेवढी पण कोणत्याही परिस्थितीत 300 दिवस अर्जित रजे बद्दलचे आणि परिवर्तीत रजेमध्ये रुपांतरीत केलेल्या संपूर्ण अर्धवेतनी रजेबद्दलचे रजा वेतन अधिक महागाई भत्ता याहून अधिक होणार नाही इतकी रोख रक्कम त्याच्या कुटूंबाला देण्यात येईल. |
| **टिप**- महानगरपालिका सेवेचा राजीनामा देणा-या किंवा ती नोकरी सोडणा-या महानगरपालिका कर्मचा-याला सेवा समाप्तीच्या तारखेला त्याच्या रजेच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या बाबतीत अशा रजेच्या अर्ध्या रजेच्या परंतू जास्तीत जास्त 120 दिवसांच्या मर्यादेपर्यंत रजा वेतन आणि महागाई भत्ता यांच्या सममुल्य रोख रक्कम मिळण्याचा हक्क असेल. दिवसाची गणना करीत असताना दिवसांची संख्या अपुर्णांकात येत असेल तर तो अपुर्णांक हिशोबात घेऊ नये. (या नवीन तरतुदीचा प्रभाव दि. 1.9.1988 पासून देण्यात आलेला आहे. ) | **टिप** - महानगरपालिका सेवेचा राजीनामा देणा-या किंवा ती नोकरी सोडणा-या महानगरपालिका कर्मचा-याला सेवा समाप्तीच्या तारखेला त्याच्या रजेच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या बाबतीत अशा रजेच्या अर्ध्या रजेच्या परंतू जास्तीत जास्त 150 दिवसांच्या मर्यादेपर्यंत रजा वेतन आणि महागाई भत्ता यांच्या सममुल्य रोख रक्कम मिळण्याचा हक्क असेल. दिवसाची गणना करीत असताना दिवसांची संख्या अपुर्णांकात येत असेल तर तो अपुर्णांक हिशोबात घेऊ नये. (या नवीन तरतुदीचा प्रभाव दि.1.9.1988 पासून देण्यात आलेला आहे.) |
| | **169 (4)** दि.1.1.2006 किंवा त्यानंतर महानगरपालिका सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत कोणत्याही कारणास्तव सेवा समाप्त झाल्यास त्याच्या खाती शिल्लक असलेल्या अर्धपगारी रजेच्या रोखीकरणाचा फायदा अनुज्ञेय होणार नाही. |

## जोडपत्र 'ब'

उदाहरण - महानगरपालिका कर्मचा-याच्या अर्जित रजा खाती 236 दिवस अर्जित रजा शिल्लक आहे व त्याने दि.24 जून ते 18 जुलै पर्यंत 25 दिवसांची अर्जित रजा घेतली. त्याच्या अर्जित रजा खाती पुढीलप्रमाणे जमा/वजावट होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | दिनांक 23 जून रोजी मनपा कर्मचा-याच्या खाती शिल्लक अर्जित रजा | 236 दिवस | |
| (ब) | वजा दिनांक 24 ते दिनांक 30 जूनपर्यंत घेतलेली सात दिवस रजा | (-) 7 दिवस | |
| | 30 जून रोजी शिल्लक अर्जित रजा | 229 दिवस | |
| (क) | अधिक 1 जुलै रोजी आगाऊ जमा करावयाची पंधरा दिवस अर्जित रजा | (+) 15 दिवस | |
| | एकूण | 244 दिवस | परंतू नियम 153 (1) बी मधील तरतुदीनुसार 240 दिवसांशी मर्यादित |
| (ड) | वजा दिनांक 1 जुलै ते 18 जुलैपर्यंत घेतलेली 18 दिवस अर्जित रजा | (-) 18 दिवस | |
| | शिल्लक | 222 दिवस | मनपा ठराव क्र.271 दि.3.7.2014अन्वये 300 दिवसांपर्यंत मर्यादित |